आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३ वाजता

९ मे २०२४ - गुरुवार

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरेया पक्षांना काँग्रेसमध्ये विलीनीकरणाशिवाय पर्याय नसल्याचा दावा भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. अहमदनगरमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

उद्धव ठाकरे हे हिंदुत्व पासून दूर गेले आहेत आणि ते काँग्रेसच्या विचाराशी सहमत आहे. त्यामुळेच त्यांनी अजमल कसाब संदर्भात काँग्रेसने केलेल्या वक्तव्याबाबत कोणतीही भूमिका स्पष्ट केली नाही, असा आरोप बावनकुळे यांनी केला. शरद पवार यांच्या हातातून बारामती आणि पश्चिम महाराष्ट्र गेला असल्यानं ते इतरांची मदत घेत असल्याचा दावा त्यांनी केला.

<><><><><>

कांदा निर्यातीसाठी केंद्र सरकारनं  लावलेला ४० टक्के कर त्वरित मागे घ्यावा,  अशी मागणी  राज्याचे काँग्रेसचे वरिष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केली. छत्रपती संभाजी नगर इथं पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्र सरकारला कर रद्द करण्याबाबतची विनंती करावी, असं ते म्हणाले. छत्रपती संभाजी नगर शहराचा पाण्याचा प्रश्न आम्ही सोडवू  तसेच औद्योगिकीकरणावर आम्ही भर देऊ असा विश्वासही त्यांनी पत्रकार परिषदेमध्ये व्यक्त केला.

<><><><><>

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण ‘पालघर’ लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज राष्ट्रपती भवनात दुसऱ्या टप्प्यात पद्म पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. त्यात सामाजिक कार्यकर्ते शंकरबाबा पापळकर यांचा समावेश आहे. या आधी २२ एप्रिलला राष्ट्रपतींनी तीन पद्मविभुषण, आठ पद्मभूषण तसंच ५५ जणांना पद्मश्री पुरस्कार प्रदान केले होते.

<><><><><>

राष्ट्रीय पोषण संस्थेनं भारतीयांसाठी आहाराचे नवे दिशानिर्देश प्रसिद्ध केले आहेत. त्यात शारीरिकदृष्ट्या कार्यक्षम राहणं, नियमित व्यायाम करणं, मीठाचा वापर मर्यादित ठेवणं, अतीमेदयुक्त पदार्थ, साखर आणि अति प्रक्रिया केलेल्या पदार्थांचा कमी वापर अशी शिफारस या दिशानिर्देशांमध्ये केलेली आहे. यामुळं पोटाचा घेर वाढणे, वजन वाढणे आणि लठ्ठपणा यावर मात करता येईल, असं हैदराबादस्थित राष्ट्रीय पोषण संस्थेनं म्हटलं आहे. यामध्ये सुदृढ आरोग्याला चालना आणि सर्व वयोगटांमध्ये आजाराला आळा घालण्यावर यात भर दिला आहे. सर्व वयोगटातल्या नागरिकांनी दररोज किमान अर्धा ते पाऊण तास व्यायाम करावा. अधिक वजन किंवा लठ्ठपणा असलेल्या मुलांनी १ तास व्यायाम करावा असा सल्लाही राष्ट्रीय पोषण संस्थेनं दिला आहे. दररोज ५ ग्रॅमपेक्षा अधिक मीठ खाऊ नये आणि लहानपणापासूनच कमी मीठाचे पदार्थ खाण्याची सवय लावावी असंही यात नमूद आहे.

<><><><><>

नागपुर शहरात आज सकाळ पासून मुसळधार पाऊस सुरू आहे. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या उन्हाळी पिकांना देखील फटका बसला आहे. भारतीय हवामान खात्याने जिल्ह्यामध्ये आज वादळीवारा, वीज, गारपीट आणि हलक्या ते

मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवलेली असून ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तर १० ते १२ मे या कालावधीसाठी येलो अलर्ट दिलेला असून या दिवशी काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसासह वादळीवारा आणि वीज गर्जनेची शक्यता वर्तवली आहे. या अनुषंगाने जिल्ह्यातील नागरिकांनी आवश्यक काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. नागपूरात नुकतेच तापमान ४३ अंश सेल्सिअसवर पोहोचले होते.

छत्रपती संभाजीनगर शहरात आज दुपारी एक नंतर पावसाने हजेरी लावली . पावसामुळे काही परिसरामधला विद्युत पुरवठा खंडित झाला होता.

<><><><><>

भंडारा जिल्ह्याला हवामान विभागानं पुढचे ३ दिवस येलो अलर्ट जारी केला आहे. दोन दिवसांपूर्वी देखील जिल्ह्याला अवकाळी पावसानं झोडपून काढलं होत. आज सकाळ पासूनच पुन्हा ढगाळ वातावरण निर्माण झालं होतं. या पावसाचा फटका रब्बी पिकांना बसणार आहे. हंगामातलं कापून ठेवलेलं धान पीक आधीच्या पावसामुळं पाण्यानं भिजलं होतं ,आता आलेल्या पावसानं शेतकरी पिकांच्या चिंतेनं हवालदिल झाला आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पंजाब किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात सामना होणार आहे. धर्मशाला येथील हिमाचल प्रदेश क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरू होईल. दरम्यान, काल झालेल्या सामन्यात सनरायजर्स हैदराबादनं लखनऊ सुपर जायन्ट्सवर १० गडी राखून विजय मिळवला.

//<><><><><>//